# ताण !

आज नेहमीप्रमाणे तो सकाळची न्याहरी करून अन् हातात अवजारांची थैली घेऊन कामाला बाहेर पडला. चार पाच घरची कामं आली होती. एका ठिकाणचा गळका नळ दुरुस्त करायचा होता. कुठं फुटका पाईप बदलून नवीन बसवायचा होता. एका बंगल्यावर अशीच काही किरकोळ कामं करायची होती...

तो घराबाहेर पडला अन् झपाझप चालू लागला.

समोरून येणाऱ्या एका जाडगेल्या व तिच्या बरोबर बारीक बाईकडे त्याचं सहज लक्ष गेलं. त्याच्या घराशेजारीच राहणाऱ्या त्या दोघींना तो ओळखत होता. त्यानं ओळखीचं स्मित केलं. त्याही हसल्या, पण त्याला त्यात कृत्रिमतेचा भास झाला.

कारण नंतर अपार सहानुभूतिदर्शक चेहऱ्यानं त्याच्याकडे बघत एकमेकींशी न बोलता त्या दोघी त्याला ओलांडून पुढे गेल्या. मागनं जाडगेल्या बाईनं घोगरट आवाजात उच्चारलेला शब्द त्याला ऐकू आला, 'बिच्चारा !'

पाठोपाठ बारक्या बाईचा सुस्कारा.

त्यानं मागे वळून पाहिलं. त्या थांबून वळून त्याच्याकडेच पहात होत्या. नजरेत ओतप्रोत सहानुभूती भरलेली, कीव भरलेली. त्याच्या नजरेशी त्या दोघींची नजरानजर होताच त्या वळून चालू लागल्या – वेगळ्याच विषयावर मोठमोठ्यानं बोलत.

त्याला काही समजेनासं झालं. 'ह्या अशा का वागताहेत आज ?'

ती बारीकशी बाई कधी त्याच्याशी फारशी बोलत नसे. पण त्या जाडगेल्या बाईकडे तो एक दोनदा जाऊन आला होता. कामानिमित्त. ती अशी वागलेली त्याला आठवत नव्हतं.

विचारांच्या चक्रात गरगरतच तो आपल्या कामावरच्या ठिकाणावर आला. घराजवळच असलेल्या एक पॉश कॉलनीत अद्ययावत फ्लॅटच्या बंद दरवाजावरची कॉलबेल त्यानं यंत्रवत् दाबली.

घरमालकिणीनं दार उघडलं. चेहऱ्यावर प्रश्न ! ती आपल्याकडे शोधक नजरेनं पाहात आहे, असा त्याला क्षणभर भास झाला. अस्वस्थ स्वरात तो म्हणाला.

"निरोप मिळाला..... तुमचा नळ...."

"आलं लक्षात. दाखवते –" म्हणत ती बाई आत वळली. मागोमाग तोही गेला. गळका नळ दुरुस्त करण्याच्या खटपटीस लागला. घरमालकीण तिथे थोडावेळ उभी राहिली. काम पहात. मग आत किचनमध्ये गेली.

त्याला मोकळं वाटलं. जो तो आज आपल्याकडे असं आरपार का पाहतोय ? त्याला प्रश्न पडला होता. तो झटकून त्यानं कामावर मन एकाग्र केलं न केलं तोच किचनमधून त्या बाईचं बोलणं त्याला ऐकू आलं काहीतरी – त्याच्या संबंधातच. संशयानं त्यानं कान टवकारले.

ती बाई नवऱ्याला सांगत होती, "वाटणार नाही हो ही बाई अशी असेल म्हणून. नवरा बाहेर पडला की त्याला घरात घेते, अन् तो परत येण्यापूर्वी हा पसार."

"कोणाची गोष्ट सांगते आहेस तू ?" नवऱ्याचा उत्सुक प्रश्न. नंतर काहीतरी कुजबुज. मग नवरा एकदम मोठ्यानं –

"त्या समोरच्या वस्तीतल्या प्लंबरची बायको ?"

"अहो हळू –" बाईचं दटावणं. मग पुन्हा कुजबुज.

त्याच्या कानाची पाळं एकदम लाल होतात. मनात भयंकर ताण उत्पन्न होतो. काहीतरी बिघडलंय, विस्कटलंय, उखडलंय पण काय ते कळत नव्हतं.

कामाचे पैसे घेताना घरमालकिणीकडे त्यानं चोरून पाहिलं.

तीच नजर करूणेनं, सहानुभूतीनं ओथंबलेली –

तो तिरीमिरीत बाहेर पडला. डोक्यात भयंकर गोंधळ घेऊन.

आजचा दिवस असा का उजाडला ? त्याला समजत नव्हतं. मध्ये एक आठवडा तो बाहेर गावी महत्त्वाच्या कामाकरता गेला होता अन् कालच परतला होता. तेवढ्यात जग असं कसं बदललं होतं ? काही समजत नव्हतं. स्पष्ट होत नव्हतं.

असाध्य रोगाची शंका आल्यावर रोगी ज्या तणावपूर्ण मनःस्थितीत वावरतो, तशा अवस्थेत तो बसस्टॉपवर उभा राहिला. एका उपनगरात जाण्यासाठी. पाईप दुरुस्तीसाठी –

हातातली अवजारांची पिशवी सांभाळत तो बसमध्ये चढला. बाजूच्या सीटवर त्याला अनाथ आश्रमाच्या संचालिका दिसल्या. सुशीलेच्या ! तो ओळखीचं हसला. त्याही औपचारिक. मग त्यांनी चौकशी केली.

"कशी आहे सुशीला ? ठीक चाललंय ?"

"उसका ठीकच च्यालला" मागून कुणीतरी भरड्या आवाजात म्हणालं

दोघांनीही मागं वळून पाहिलं. त्याच्या वस्तीतला दादा आपले पानानं रंगलेले दात दाखवून हसत होता. कुत्सित -

तो एकदम चिडला. 'साले टकलू' म्हणत त्याच्या अंगावर धावून गेला. जाब विचारायला.

"गाली देनेका काम नही. घरामंधी पुछताछ कर पैले. फिर बोल. सालं साऱ्या वस्तीले मालूम पडलं. आन -" दादानं त्याला झटकलं.

तो एकदम गोठून गेला. साऱ्या प्रकाराचा अर्थच त्याला कळत नव्हता. फुटणारं मस्तक धरून तो तसाच बस बाहेर पडला. पाठोपाठ संचालिकाही -

त्यांनी त्याच्या पाठीवर हात ठेवला. मायेनं समजावलं - सुशीलेची हमी दिली. शेवटी म्हणाल्या.

"घरी जा. तिलाच विचार, लोकांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नको. रागावू नको. ते नेहमी पराचा कावळा करतात. नसते काहीच. सुशीलेला मी लहानपणापासून ओळखते आहे."

तो घरी परत यायला निघाला. विचार करीत. फक्त एक आठवडा तो बाहेर गावी गेला होता. एवढ्यात काय बिघडलं ?

त्याला स्वत:चीच कीव येऊ लागली.

अन् जगाचा रागही -

या जगानं त्याला काय दिलं होतं ?

या जगात तो आपल्या मर्जीनं तरी आला होता का ?

समजू लागल्यापासून त्याला आपले आईबाप माहीत नव्हते. झोपडपट्टीत एखाद्या बेवारस कुत्र्यासारखा तो लहानाचा मोठा झाला होता. मिळेल ते काम करत. मिळेल ते काम शिकत. परिस्थितीशी टक्कर देत त्यानं आपलं आयुष्य उभं केलं होतं. वस्तीत भाड्याची खोली घेतली होती. अन् आयुष्यात जोडीदाराची गरज भासू लागल्यावर त्यानं सरळ अनाथ आश्रमाकडे धाव घेतली होती.

अनाथ आश्रमात वाढलेल्या सुशीलेशी विवाह करून आपलं छोटसं घरकुल उभारलं होतं.

सुशीला नावाप्रमाणे होती. तिनं टापटिपीनं कोंड्याचा मांडा करून निगुतीनं त्याचा संसार आज वर्षभर सांभाळला होता. हसतमुखानं. आयुष्यात

प्रथमच तो एवढा सुखी झाला होता.

कुणाची दृष्ट लागली ?

तो कोण घरी यायला लागला ? केव्हापासून ? संबंध काय त्याचा सुशीलेशी ....?

त्याला अचानक त्याच्या मित्राचं बोलणं आठवलं -

"आश्रमातली मुलगी बायको करून घेतोयस. विचार कर. ह्या मुलींची काय काय लफडी असतील सांगता येत नाही...."

त्याच्या घरासमोरच्या पानठेलेवाल्यानं त्याला पाहून डोळा बारीक करून शीळ वाजवली; तसा त्याचा राग पुन्हा उफाळून वर आला. त्या तिरीमिरीत तो घरासमोर आला अन् आता दारावर थाप मारणार, इतक्यात त्याला आतून सुशीलेचा आवाज ऐकू आला - सुशीला म्हणत होती,

"आता येणं बंद कर. हे कालच रात्री परत आलेत. कामावर गेले आहेत. त्यांना समजलं तर -"

"मी समजावीन त्यांना.... पण सुशे माझं येणं बंद करू नको गं."

कुणीतरी तरुण आत आहे हे समजताच सकाळपासूनच्या साऱ्या घटनांचा सरळ साधा अर्थ त्याला खाडकन लागला. संतापाची अनिवार लाट त्याच्या शरीरावर उसळली. अन् खाडकन एक लाथ मारून त्यानं दार उघडलं - दार नुसतं लोटलेलं होतं -

आत सुशीला थरथरत उभी होती अन् एक दांडगा तरुण त्याच्याकडे विस्मयानं पहात होता. पकडल्या गेल्याचा भाव मात्र त्यांच्या नजरेत दिसत नव्हता.

त्याच्या बेशरमपणानं आगीत अधिकच तेल ओतल्या गेलं. खाडकन सुशीलेच्या मुस्कटात ठेवून तो ओरडला -

"बेईमान ! माझ्या मागे हे धंदे करते ?" सुशीला एकदम कोलमडली. रडू लागली. त्याच्या पायाला मिठी मारून विनवणी करू लागली.

"तो माझा भाऊ आहे." असे म्हणू लागली.

आणाशपथा घेऊ लागली.

तिच्या खोटेपणानं तो अधिकच चिडला.

"सटवे ! मग चोरून का भेटत होतीस - किती भाऊ हाय तुला आनखी असे -"

अन् तिच्या कमरेत तो लाथ घालणार, इतक्यात तो तरुण जरब बसवणाऱ्या आवाजात म्हणाला –

"हो मागं ! मी सांगतो. खरंच बहीण हाय ती माझी. सख्खी–"

तो चमकला. त्या तरुणाचा आवेश काही वेगळाच वाटला त्याला. अपराधीपणाचं काही एक चिन्ह त्याच्या चेहऱ्यावर दिसलं नाही. तरी उसनं अवसान आणून त्यानं विचारलं.

"काय म्हनतोस ?"

अन् त्या तरुणानं एकदम भडभडा सांगून टाकलं – आवेगानं, याचनेच्या सुरात, डोळ्यात आसवं आणून –

अन् सगळा उलगडा झाला –

तो तिचा सख्खा भाऊच होता – तिच्या बरोबरच आश्रमात वाढलेला. काही दिवसांपूर्वीच आश्रमात चोरी करून पळून गेलेला – कारावास भोगून परत आलेला – मागच्याच आठवड्यात.

सुशीलेला धास्ती वाटत होती. तिला एक भाऊ आहे, अन् तो असा चोर आहे हे नवऱ्याला समजलं तर तो त्याला घरात येऊ देणार नाही. स्वत: बेवारशासारखा वाढला असला, तरी तिचा नवरा कधीच वाईट मार्गानं गेला नव्हता. अन् त्याला ह्या गोष्टींचा तिरस्कार होता, हे सुशीलेला माहीत होतं.

म्हणून हे चोरून भेटणं – त्याच्या मागे !

त्याचा सकाळपासूनचा सगळा ताण क्षणात ओसरला अन् त्याला हसायलाच येऊ लागलं.

---